RNI no: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH/MR/NW-35/2014-2016
Date of Publication : 12th January 2014 ✸ Posting : 15th January 2014 ✸ Pages : 36
Posted at : Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai 400001

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : अकरा | अंक : सातवा | जानेवारी २०१४

नुतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा (नववर्षाचा संदेश) 5

नामास विसरू नका (सत्संग) 7

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 19

पवित्र जीवन (पवित्र गुहेच्या दर्शनापूर्वी दिलेला संदेश) 29

अमृतवेळ (ध्यान-अभ्यासाविषयी मार्गदर्शक संदेश) 33

धन्य अजायब (आश्रमातील कार्यक्रमांची माहिती) 34

'बंधूनो! तुम्ही नामास विसरू नका.निद्रावस्थेत-जागृतावस्थेत, उठता-बसता तुम्ही नामाची कमाई करा. संत सतगुरु आम्हांस प्रेमाने सांगत आहेत की नामाशिवाय आपण परमात्म्याच्या दरबारात प्रवेशदेखील करू शकत नाही, मुक्ती मिळणे तर अशक्यच आहे.'

– गुरु नानक देवजी महाराज –

मालक मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट १२५, वडाला उद्योग भवन, मुंबई - ४०००३१ येथे छापून सी/५०३ म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०००६७ फोन नं: (०२२) २४९६५००० येथून प्रसिद्ध केले. १२७



नुतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

परम संत अजायब सिंह महाराजांनी नववर्षानिमित्त दिलेला संदेश,
संतबानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान – १ जानेवारी १९९३

तुम्हा सर्वांना परमात्मा सावन कृपालजींच्या स्मरणार्थ **नुतन वर्षाच्या खूप खूप हार्दिक शुभेच्छा**. मनुष्याच्या जीवनात नविन वर्ष म्हणजे एक नवीन सुरुवात असते. प्रत्येक सत्संगी व्यक्तीस आत्मनिरीक्षण करुन जीवन पडताळ करणे तसेच वर्षाप्रारंभी आढावा घेणे गरजेचे असते की गेल्या वर्षी आपण किती ध्यान–अभ्यास व नामस्मरण केले, आपले मन व विचार किती पवित्र बनविले आणि आपण किती पवित्र झालो. हा आढावा कोणत्या पद्धतीने घ्यावा, याचे मार्गदर्शन या जगात येणाऱ्या प्रत्येक संत–महात्म्यांनी त्यांच्या सेवकांना केलेले आहे. गुरु नानक देवजी, गुरु रामदासजी, गुरु गोविंद सिंहजी यांनी देखील सेवकांना जीवन पडताळण्याविषयी माहिती दिली आहे.

पूर्वी गुरुसाहेबांच्या कारकिर्दीत अनेक प्रेमी संगतमध्ये उभे राहून सांगत असत की त्यांनी ध्यान–अभ्यासात किती प्रगती केली तसेच त्यांनी किती वाईट कृत्ये केली व त्यांच्यात किती दोष आहेत. अशावेळी गुरु गोविंद सिंहजी सेवकांना म्हणत असत, ''तुमच्या हातून जेव्हा एखादे पाप होईल, तेव्हा तुम्ही एक दगड एका बाजूला जमा करीत जा व नंतर ते दगड मोजा. तुम्ही केलेल्या पापांची तुम्हांस कल्पना येईल; त्यामुळे तुम्हांस लाज देखील वाटू लागेल.''

करतूत पशु की मानस जात लोक पचारा करे दिन–रात।

आपण स्वतःस मनुष्य म्हणवितो, दिसायला देखील आपण मनुष्यच दिसतो, परंतु स्वत:ची कृत्ये पाहून आपणांस जरुर लज्जा वाटेल. अशा कृत्यांची नोंद ठेवण्यासाठी परमात्मारूपी महाराज कृपालजी आम्हांस डायरी देत असत, ज्यास आपण रोजनिशी, डायरी वा जीवन पडताळ म्हणू शकतो. आमच्यासमोर महाराजजींनी नामदानाच्या वेळी अशा डायऱ्या वृद्ध स्त्रियांना दिल्या. परंतु सदर डायऱ्या त्यांनी आपल्या घरात उंच ठिकाणी ठेवून, त्यांच्यासमोर तुपाचा दिवा लावण्यास व धूप देण्यास सुरुवात केली.

नंतर एकदा महाराजजी त्या ठिकाणी आले असता, त्यांनी विचारले, ''बंधू–भगिनींनो, तुम्ही डायरीत आपल्या कर्मांची नोंद ठेवता का? तुमच्या जीवनाची पडताळणी करता का?'' तेथील एका वृद्धाने व एका वृद्धेने उत्तर दिले की,''ती डायरी आम्ही घरात उंच ठिकाणी सांभाळून ठेवली आहे, त्या डायरीस खरकट्या हातांनी स्पर्शदेखील करीत नाही. त्या डायरीसमोर दररोज तुपाचा दिवा लावतो तसेच धूप देखील दाखवतो.''

संत–महात्मा अशी डायरी आम्हांस तुपाचा दिवा लावण्यासाठी व धूप दाखविण्यासाठी देत नाहीत. आपण रोज दिवसभरात किती ध्यान–अभ्यास केला? कोणाची चुगली–निंदा केली? आपल्या जिव्हेद्वारे वा विचारांद्वारे कोणाचे वाईट चिंतीले? आपल्या पैशांद्वारे कोणाचे भले वा वाईट केले का? या सर्वांची डायरीत नित्यनेमाने नोंद करून आपल्या जीवनाची पडताळणी करावी, यासाठी ते डायरी देतात. रात्री झोपण्यापूर्वी आपण जेव्हा डायरीत वरील सर्व बाबींची नोंद करतो, तेव्हा मनाचा धिक्कार आपण करतो, तसेच स्वतःस लाज देखील वाटते की किती चुकीची कृत्ये मी करीत आहे.

पाश्चिमात्य देशातील प्रेमी या डायरीची अतिशय कदर करतात. मी तेथील दौऱ्यावर असता पहातो, रात्री झोपण्यापूर्वी नित्यनेमाने ते डायरीत नोंद करतात की आपण आज काय केले? ध्यान–अभ्यासात किती प्रगती केली? अंतर्यात काय पाहिले? शब्द ऐकू येतो का? सत्संगी प्रेमींनी जीवन पडताळ केली पाहिजे. संसारिक प्रगती मृत्यूनंतर आपल्यासोबत जात नाही, किंबहुना त्यांच्यामुळे आपल्या अंतरात अहंकारच निर्माण होतो की आपण श्रीमंत झालो आहोत, आम्हांस इतकी मुले–मुली आहेत. या संसारिक गोष्टी येथेच राहणार आहेत. आपली प्रगती केवळ ध्यान व नामस्मरणाच्या मदतीनेच होते. केवळ नामाची कमाईच आपणांस या जगात शांती तसेच परमात्म्याच्या दरबारात स्थान मिळवून देते. गुरु नानक सांगतातः

तोसा बंधो नाम का ऐथे ओथे नाल।

मी पुन्हा एकदा तुम्हा सर्वांना नुतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो.

आपला प्रिय – अजायब सिंह

नामास विसरू नका

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज,
गुरु नानक देवजी महाराजांची वाणी, मुंबई – ८ जानेवारी १९९६

परमात्मा सावन कृपालजींचा मी आभारी आहे, ज्यांनी मला त्यांची यशोगाथा गाण्याची संधी दिली. ज्या मनुष्याने खडीसाखर खाल्लेली आहे, त्या मनुष्यासच खडीसाखरेच्या चवीचे ज्ञान असते. याचप्रमाणे ज्या मनुष्याने गुरु–चरणी बसून नामरूपी रसाचा आस्वाद घेतला आहे, तो मनुष्यच त्या गोष्टींच्या आस्वादाचे महत्त्व जाणतो, तोच त्यांचे फायदे सांगू शकतो. तुमच्या समोर गुरु नानक देवजींची वाणी सादर केली जात आहे.

गुरु नानक देवजी त्यांच्या शिष्यांना अतिशय प्रेमाने नामाचे महत्त्व तसेच या जगाच्या वेगवेगळ्या रंगाबद्दलही सांगत आहेत की या जगाचा रंग कच्चा असून तो उतरण्यास काहीच वेळ लागत नाही. परंतु त्याच्या समोर नामरंग अतिशय पक्का आहे. एखाद्या आत्म्यावर एकदा का हा नामरंग चढला तर तो उतरता उतरत नाही. परंतु या नामाशिवाय जीवाची जी दुर्दशा होते, ती केवळ संत–महात्माच जाणतात.

परमेश्वराच्या भक्तीशिवाय जीवाची अशी दुर्दशा होते जशी पंखाशिवाय पक्षांची दुर्दशा होते, पाण्याशिवाय जसा मासा तडफडून मरतो, नेत्रांशिवाय माणसाची किती वाईट परिस्थिती होते. भाकड गाय निरुपयोगी झाल्याने तिला कसायांच्या ताब्यात दिले जाते. जर वेश्येने एखाद्या बाळास जन्म दिल्यास त्याचा पिता म्हणून ती कोणाचे नाव लावू शकेल? जसे बागेची फळा–फुलां शिवाय शोभा नसते, सोंडेशिवाय हत्ती तर नाकाशिवाय मनुष्य विद्रुप दिसतो, त्याप्रमाणेच नामाशिवाय जीवाची परमात्म्याच्या दरबारात काहीच शोभा नसते. गुरु नानक देवजी महाराज त्यांच्या शिष्यांना प्रेमाने समजावत आहेत, हे पहा प्रियजनहो! मृत्यूनंतर या जगातील धनसंपत्ती, राजपाटच नव्हे

तर तुम्ही काळजीपूर्वक निगा राखत असलेले शरीर देखील तुमच्यासोबत जाणार नाही. कबीर साहेब सांगत आहेतः

ऐसा संगी कोई नहीं जैसी सग्गी देह । मरती वरया रे नरा साड़ के कीती खेह ।।

शरीर व आत्म्याची साथ घनिष्ठ व दीर्घकाळाची असते! दोघेही सतत एकत्र राहतात, परंतु मृत्यूसमयी आत्मादेखील शरीरास सोडून भरारी मारून उडून जातो व त्या देहास मातीत मिसळावे लागते.

प्रियजनहो! नामाशिवाय हा आत्मा जळत–जळतच या जगात येतो व जळत–जळत हे जग सोडून जातो. बोलताना तर आपण बोलतो की मी अतिशय शांत आहे, परंतु आपल्या अंतरात कधी काम–अग्नी भडकतो तर कधी क्रोध–अग्नी भडकतो. क्रोध आल्यावर एक भाऊ आपल्या सख्ख्या भावास तर पती आपल्या पत्नीस देखील माफ करीत नाही. याच प्रमाणे इतरांची प्रगती पाहून आपण ईर्षेच्या अग्नीत जळतो, ज्याचे वर्णन करणे देखील कठीण आहे. फरीद साहेब म्हणतातः

गुज्री भाय जले संसारा।

इतरांची उन्नती पहात पहात जीव जागृतावस्थेत तसेच निद्रावस्थेतदेखील ईर्षेच्या अग्नीत जळत असतो. म्हणूनच संत सतगुरु सांगतात मनुष्य गर्भावस्थेत आईच्या उदरामध्ये जठर अग्नीत अशारितीने जळत असतो की, त्याची हाडे तीन महिने भाजली जातात. त्या जठर अग्नीचा ताप (उष्णता) इतका असतो की, त्या उष्णतेसमान या जगात कोठेही उष्णता नाही. अशा गर्भातील जठर अग्नीत मनुष्याची हाडे भाजून इतकी मजबूत होतात की कबरीमध्ये हजारोवर्षे दफनावस्थेमध्ये राहूनही हाडांचा भूसा होत नाही, तसेच अग्नीमध्ये जाळूनही हाडे भस्म होत नाहीत, ती तशाच अवस्थेत राहतात. आईच्या उदरात एवढ्या उष्णतेमध्ये गर्भरूपी मांसाचा तुकडा कुशीही बदलू शकत नाही. तुम्हीच पहा! ही अवस्था जळण्याची व त्रासदायक अवस्था नाही का? ह्या अवस्थेत किती वेदना होत असतील? गुरुनानक म्हणतात, या अग्नीपासून स्वतःच्या बचावासाठी आत्म्यास परमात्म्याच्या नामाची भक्तीशिवाय दुसरा कोणताही आसरा नाही.

मोती त मंदर ऊसरहि रतनी त होहि जड़ाउ ।
कसतूरी कुंगू अगरि चंदनि लीपि आवै चाउ ।।

आपण प्रेमाने समजावता की, गोरगरीबांची घरे मातीची किंवा पानांची अथवा (नारळाच्या) झावळ्यांची बनलेली असतात, कोणी घर बनविताना मजबुतीसाठी सिमेंटचा वापर करतो, घराची चांगली रंगरंगोटी करतो.

प्रियजनहो! समजा परमात्म्याने आपल्यावर कृपा करून आपल्या वास्तव्यासाठी मनमोहक चमकणाऱ्या रत्नांनी व मोत्यांनी जडलेले मंदिर (घर) दिले, ज्यामध्ये सर्वत्र आपले रूप दिसत असेल; त्यावर चंदन व कस्तुरीने लेपन केलेले असेल, ज्याच्या सुगंधाने आपणांस इतकी शांत झोप येईल की सकाळी सुर्योदय झालेलाही आपणांस कळणार नाही. असे मोती–रत्नजडीत घर जरी परमात्म्याच्या कृपेने मिळाले तरी तुम्ही परमात्म्यास व त्याच्या नामास विसरू नका कारण घर मोती–रत्नजडीत असो वा माती–सिमेंटचे असो यांपैकी कोणतेही घर मृत्यूसमयी आपल्यासोबत जात नाही.

प्रियजनहो! सन १९४७ पूर्वी हिंदुस्थानवर इंग्रजांचे राज्य होते. त्याकाळी हिंदुस्थानात शक्तीशाली राजे राज्य करीत होते. वर वर्णन केल्याप्रमाणे त्या राजांनी स्वतःस राहण्यासाठी अतिशय सुंदर रत्नजडीत राजमहाल बनविले होते. त्यांच्या राण्यांचे दागिने अतिशय मौल्यवान असत, ज्यांच्यावर अत्यंत मौल्यवान मोती जडलेले होते. हे सर्व मी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले आहे. परंतु हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर त्यावेळेच्या सरकारने ते राजमहाल स्वतःच्या ताब्यात घेतले. त्या राजवाड्यांमध्ये आता सरकारी कचेऱ्या स्थापन झाल्या असून राण्यांचे मौल्यवान दागदागिने लिलावात करोडो रूपयांना विकले गेले.

जे राजे आता जीवित आहेत, ते त्यांनी स्वतःच्या राहण्यासाठी बनविलेल्या राजवाड्यांमध्ये जाऊही शकत नाहीत. मी दोन–तीन राजांना मृत पावताना पाहिले ज्यांनी मोती–महल, हीरा–महल नामक राजमहाल बनविले, परंतु ते राजमहाल स्वतःसोबत नेऊ शकले नाहीत. तेथे आता केवळ कबुतरे रहातात.

त्या राजांच्या कारकिर्दीमध्ये कायदे इतके कडक होते की, कोणीही स्वतःच्या मर्जीने वाद्ये वाजवू शकत नव्हते, आनंद साजरा करू शकत नव्हते. केवळ राजे लोकांच्या मनोरंजनासाठी राजमहालामध्येच नर्तक लोक रात्री बारा वाजेपर्यंत वाद्ये वाजवित, नृत्य करीत. तेच राजे आज बेवारस असल्याप्रमाणे कबरींमध्ये झोपले आहेत.

तुम्ही अनुराग सागरमध्ये ('प्रेमाचा सागर' या ग्रंथात) वाचता, काळाने कबीर साहेबांना किती लालच देण्याचा प्रयत्न केला व खोटी आत्मियता दाखविली की,''तुम्ही मला तुमची मोहर-छाप (शिक्का) दाखवावा व मी आत्म्यावर लागलेला तुमचा शिक्का पाहून आत्म्यास सोडून देत जाईन.'' जेव्हा कबीर साहेब काळाच्या खोट्या प्रेमाच्या वशात आले नाहीत तेव्हा काळाने त्यांना अनंत यातना दिल्या. शेवटी काळ कबीर साहेबांना म्हणाला, ''मी तुमच्या नावाने अनेक पंथांची सुरुवात करीन. घराघरामध्ये मांस व मद्य सेवन करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करीन. केवळ पुरुषच नाहीत, तर स्त्रियादेखील या वस्तूंचे सेवन करू लागतील.''

कबीर साहेबांप्रमाणेच परमात्म्याच्या आज्ञेनुसार गुरु नानक देवजी या जगात आले असताना, काळ त्यांना देखील भेटला. सर्व प्रकारचे लालच गुरु नानक देवजींना देत काळ त्यांना म्हणाला, ''तुम्ही रात्रंदिवस लोकांना उपदेश करीत जंगलामधून फिरत असता. मी तुम्हांस राहण्यासाठी मोती-रत्नजडीत महाल बनवून देतो, ज्यावर कस्तुरीचे लेपन केलेले असेल. तुम्ही त्या महालात मौजमस्ती करा. तुम्ही लोकांना उपदेश करीत फिरण्याची गरज काय?''

गुरु नानक देवजी काळास म्हणाले, ''हे बघ प्रिय बांधवा! तू अशारितीने बनविलेले महाल जरी मला दिलेस तरी नामाशिवाय ते माझ्या काय कामाचे? अखेरीस एके दिवशी हे शरीरदेखील त्यागून मला येथून जायचे आहे.''

गुरु नानक देवजी महाराज आम्हांसदेखील सावधान करीत आहेत की, काळ आपणांस जरी असे सुगंधीत घर देत असेल, बऱ्याचदा तसे मिळते देखील, तरीही तुम्ही नामस्मरण व परमात्म्याची भक्ती सोडू नका. अशी घरे

मिळाल्यानंतर तुम्ही कदापिही विचार करू नये की आपणांस येथून कोणी हटविणार नाही. मृत्यूसमयी तुमच्या लक्षात येईल की एखाद्या प्रवाशासमान आपणांस देखील हे ठिकाण सोडून जावे लागणार आहे.

मतु देखि भूला वीसरै तेरा चिति न आवै नाउ ।।
हरि बिनु जीउ जलि बलि जाउ ।।

आता आपण प्रेमाने सांगता, नामाशिवाय जीव भाजत–भाजत आला आहे व तसाच येथून जाणार आहे. प्रियजनहो! चितेचा अग्नी एके दिवशी आपले शरीर जाळणारच आहे. त्यावेळी शरीरात आत्मा नसल्याने शरीर जळत असताना त्यास ना दुःखाची ना सुखाची अनुभूती होते. तसेच एके दिवशी कबरीत पुरल्यावर या शरीरामध्ये किडे पडून ते शरीराचे मांस खाणार आहेत. त्यावेळी देखील शरीरास दुःखाची वा सुखाची अनुभूती होणार नाही. परंतु या शरीरास ईर्षारूपी किडे रात्रंदिवस चावत आहेत, ही ईर्षा दररोज शरीरास जाळत आहे. तसेच आपण रात्रं–दिवस काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकाराच्या अग्नीत कसे जळत आहोत.

मी ही घटना अगोदर तुम्हांस अनेकदा सांगितलेली आहे, आतादेखील ती प्रेमाने सांगत आहे की जेणेकरून तुम्हा सर्वांनी त्या गोष्टीपासून बोध घेऊन तुमचा फायदा व्हावा. अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा अमेरिकेहून मला एका मुलीचे पत्र आले. तिच्या शाळेतील दुसरी एक मुलगी तिच्याहूनही सुंदर आहे असे तिला वाटत होते. खरेतर आपण स्वतःचा चेहरा बारकाईने निरखून पहात नाही. आपणांस नेहमी इतरांकडे असलेल्या गोष्टीच सुंदर वाटतात.

पत्रात त्या मुलीने लिहीले होते, माझ्या शाळेत माझ्याहूनही सुंदर दुसरी एक मुलगी आहे. तिच्याकडे पाहून माझे हृदय ईर्षेच्या अग्नीने जळू लागते. मी दोन्ही मुलींना पाहिलेले असल्याने, त्या पत्राच्या उत्तरादाखल मी पत्र लिहिले की, मुली! तू पत्र लिहीण्याअगोदर मला भेटली असतीस तर तुला शांती लाभली असती. माझ्या दृष्टीने तू तिच्याएवढीच सुंदर आहेस.

तुम्हीच पहा! आपणांस इतर कोणी आपल्याहून सुंदर असलेले देखील सहन होत नाही. कोणी आपल्याहून उंच असल्यास आपण दुःखी होतो व बुटके असल्यास देखील आपण दुःखी होतो, तर मग आपण सुखी कोठून होणार?

प्रियजनहो! मी जेव्हा हिंदुस्थानी प्रेमींना भेटतो तेव्हा माझ्याजवळ आनंद नावाचा सेवादार उभा असतो. येथे सत्संगामध्ये बब्बीदेखील बसलेला आहे. या बिचाऱ्याच्या पूर्वकर्मांनुसार त्याच्या शरीरामध्ये व्यंग निर्माण झाले आहे, तो स्पष्ट बोलू देखील शकत नाही. हा मला भेटण्यासाठी जेव्हा खोलीच्या आत येऊ लागला, तेव्हा आनंदने त्यास अडवले. असो, तो आत आल्यावर आनंद त्यास तेथे उभे देखील राहू देत नव्हता. आनंदला वाटले की हा व्यंग असलेला व्यक्ती काय बोलू शकणार? मी बाहेर डोकावून पाहिले व आनंदला म्हणालो, ''यास आतमध्ये येऊ दे व तू बाहेर जा.''

मला कल्पना होती की बब्बीला माझ्याबरोबर ध्यान-अभ्यासाबद्दल बोलायचे होते. परंतु आनंदला आतमध्ये चाललेली चर्चा ऐकण्याची सवय आहे. खरे तर अशी सवय अनेकांना असते की इतरांचे बोलणे ऐकण्यास काय हरकत आहे? कारण आपण त्यांचे बोलणे ऐकत आहोत, हे ते पाहू शकत नाहीत असे आपणास वाटते. बब्बी जेव्हा तो अंतर्यात पहात असलेल्या अनुभवांबद्दल बोलू लागला, तेव्हा मी त्याचा हात पकडून म्हणालो की,''तू माझ्या समीप येऊन हळू आवाजात सांग.'' त्याने मला तो ध्यान-अभ्यासामध्ये कोठपर्यंत अंतर्यात जातो? तेथे तो काय पाहतो? ते सर्व काही सांगितले. त्याचे ते आंतरीक अनुभव ऐकून माझे हृदय अतिशय प्रसन्न झाले की याची ध्यान-अभ्यासात उत्तम प्रगती आहे. त्यानंतर बब्बी निघून गेल्यावर, आनंद येऊन मला म्हणाला की, ''मी तर यास सामान्य प्रेमी समजत होतो, त्यास धक्के मारीत होतो.'' मी आनंदला म्हणालो,''कोणत्याही व्यक्तीचे शरीर किंवा त्यातील व्यंग पाहू नयेत, त्याचे गुरुंप्रती किती प्रेम आहे, ते पहावे. जर कोणाच्या शरीरात व्यंग असल्यास त्यास आपण धक्के मारावेत काय?'' कबीर साहेब सांगतातः

नाम जपत कोड़ी भला चो चो पए जिस चाम ।
कंचन देह किस काम है जे मुख नाहीं नाम।।

आपण इतिहासात वाचतो की अष्टवक्र नामक ऋषींनी राजा जनकास परमार्थाचे ज्ञान इतक्या अल्प वेळेत दिले होते, जितका वेळ एखाद्या व्यक्तीस घोड्याच्या रिकबीमध्ये आपला पाय अडकवून त्यावर आरूढ होण्यास लागतो. त्या ऋषींच्या शरीरामध्ये आठ ठिकाणी व्यंग असल्याने त्यांना अष्टावक्र असे म्हटले जाई. म्हणून प्रियजनहो! आपण परमार्थामध्ये कोणाच्याही शरीराकडे लक्ष देऊ नये. येथे आपली आंतरीक उन्नती व आपले सतगुरुंप्रती असलेले प्रेम महत्त्वाचे असते. नामाखेरीज जीव या जगात पोळत-पोळत येतो व पोळत-पोळतच या जगातून जातो, धावत-धावत येतो तर पळत-पळत परत जातो. यास ना भुतकाळाचे ना भविष्यकाळाचे ज्ञान आहे की मी कोठून आलो व मला कोठे जायचे आहे?



मैं आपणा गुरु पूछि देखिआ अवरु नाही थाउ ।।

गुरु नानक देवजी महाराज सांगत आहेत की, माझ्या सतगुरुंनी मला अतिशय प्रेमाने व विश्वासाने सांगितले आहे की नामाशिवाय जीवास कोठेही स्थान मिळत नाही, तो नामाशिवाय भवसागर पार करूच शकत नाही. तो नामरूपी जहाजामध्ये बसूनच भवसागरापार जाऊ शकेल. या नामरूपी जहाजाची संरचना स्वतः परमात्म्याने करून ते जहाज त्याच्या प्रिय मुलांच्या म्हणजेच संतांच्या ताब्यात दिले आहे. कबीर साहेब म्हणतातः

दीनदयाल भरोसे तेरे सब परिवार चढ़ाया बेड़े ।

जे तिस भावे हुक्म मनावे, इस बेड़े को पार लगावे।।

तू जीवांवर दया करीत आहेस. मी तुझ्या विश्वासावरच सर्व संगतरूपी परिवारास नामाच्या जहाजामध्ये चढविले आहे. आता मी तुला विनंती करीत आहे की तू सर्वांना या भवसागरातून पार कर, कारण तुझ्या आसऱ्यावरच सर्व विश्वाचा कारभार चालत आहे. तुझी मर्जी आहे की या आत्म्यांद्वारे नामाची कमाई कशी करवून घ्यावी! ह्यांना तुझाच आश्रय आहे. गुरु गोविंद सिंहजी म्हणतात, सतगुरु रात्रंदिवस परमात्म्यासमोर आपल्या शिष्यांसाठी प्रार्थना करीत असतात की,''हे परमात्मा! यांना थोडे जरी दुःख झाले, तर ते दुःख मला झाल्यासारखे आहे. यांना दुःखाने तळमळताना मी पाहू शकत नाही.''

दास दुखी ते मैं दुखी ।

माझ्या प्रिय मुलांनो! संत आपणांस रात्रंदिवस वारंवार समजावत आहेत की, तुम्ही ध्यान–अभ्यास करा, वाईट कर्मांपासून दूर रहा कारण आपणांस ही दुःखाची नगरी पार करावयाची आहे. तेव्हा वेळेची कदर करा. महाराज कृपाल सांगत,''समुद्राची लाट तसेच वेळ कोणाचीही वाट पाहात नाहीत.''

धरती हीरे लाल जड़ती पलंग लाल जड़ाओ ।
मोहणी मुख मणी सोहे करे रंग पसाओ ।।

आपण आपल्या घरांमध्ये संगमरवरासारख्या महागड्या लाद्या बसवितो. परंतु गुरुसाहेब समजावतात घरामध्ये भले हिरेजडीत लाद्या बसविलेल्या असोत, तेथील पलंगाचे पाय भलेही रत्नजडित असो, तसेच त्या महालामध्ये अतिशय सौंदर्यवान चंद्रमुखी स्त्रिया भलेही नृत्य करीत असोत, या गोष्टी परमार्थामध्ये आपल्या काहीच उपयोगाच्या नसतात. किंबहुना यांमुळे आपल्या मनात अशांती निर्माण होते. आपले मन या गोष्टींमध्ये विखुरते. या सर्व गोष्टी जरी या जगात आपणांस मिळाल्या, तरीही आपण **नामास विसरू नये**. या गोष्टी मृत्यूनंतर येथेच सोडाव्या लागणार असल्याने त्या आपल्या काहीच उपयोगाच्या नाहीत. नामाशिवाय इतर कोणीही आपला मित्र, साथीदार नाही.

मत दिख भूला विसरे तेरा चित्त न आवे नाओ ।
सिद होवा सिद लाई रिद आखा आओ ।
गुप्त प्रगट होए बेसा लोग राखे पाओ ।

गुरु नानकदेवजी महाराज आपल्या प्रिय शिष्यांना उपदेश देत आहेत की, नामधारक आत्म्यास ध्यान–अभ्यास करीत असताना प्रथम टप्प्यावरच रिद्धी–सिद्धी येऊन घेरतात,परंतु रिद्धी–सिद्धी प्राप्त झाल्यानंतर तुम्ही **नामास विसरू नये**. खरे तर ध्यान–अभ्यासाचा तसेच नामाचा विसर पडावा म्हणूनच त्या शिष्याच्या परमार्थसाधनेच्या मार्गाआड येतात.

रिद्धी–सिद्धी प्राप्त असलेले लोक इतरांना म्हणतात की, ''परमात्म्याने जरी तुम्हांस अपत्य दिले नसेल, तरीही आम्ही ते देऊ शकतो. एखाद्या रोगावर डॉक्टर औषधोपचार करून तुमचा इलाज करू शकत नसेल, तरीही आम्ही तुम्हाला निरोगी बनवू शकतो.''

ज्याप्रमाणे रात्रीच्या वेळी काजवे पंख उघडतात तेव्हा उजेड होतो, त्यांनी पंख मिटताच उजेड नाहीसा होतो, त्यांच्या पंखांची ठेवणच तशी असते, त्याचप्रमाणे रिद्धी–सिद्धी प्राप्त असलेले लोक, बसल्या–बसल्या अदृश्य होऊन त्यांच्या इच्छेनुसार कोठेही जाऊन प्रगट होऊ शकतात. जेव्हा ते अशा रितीने प्रगट वा अदृश्य होतात, तेव्हा इतर लोक त्यांची प्रशंसा करतात की हे किती महान आहेत. ते कधी वाघाचा तर कधी सापाचा देह धारण करतात. परंतु अशा प्रकारचे चमत्कार करून रिद्धी–सिद्धी प्राप्त असलेले लोक त्यांची पारमार्थिक कमाई वाया घालवितात. त्यांना परमात्म्याच्या दरबारी केवळ रिक्त हातांनीच जावे लागते, यमाच्या स्वाधीन व्हावे लागते.

महाराज सावन सिंहजी त्यांच्या प्रिय शिष्यांना सांगत असत की,''तुम्ही रिद्धी–सिद्धींकडे दृष्टीक्षेप देखील टाकू नका. यांचा वापर करणे म्हणजे एखाद्या वेश्येच्या कमाईचे अन्न खाण्यासमान आहे.''

योगीजन योगाभ्यास व प्राणायाम करून स्वतःच्या शरीरास कष्ट देतात. परंतु योगाभ्यास करीत अंतरात गेल्यावर ते रिद्धी–सिद्धींमध्ये फसतात, ते योग–मार्ग सोडून देतात. योग शब्दाचा खरा अर्थ आत्म्यास परमात्म्याशी जोडणे हा आहे. आत्मा तसेच परमात्मा दोघेही आपल्या शरीरामध्येच आहेत. परंतु योगी लोक शब्द–नामाचा मार्ग सोडून प्राणायामाच्या साधनेमध्ये अडकतात, रिद्धी–सिद्धींमध्ये फसतात. त्यामुळे अशा रिद्धी–सिद्धी धारकांची अवस्था जुगार खेळून त्यात हरलेल्या जुगाऱ्याप्रमाणे होते.

सुलतान होवा मेल लश्कर तख्त राखा पाओ ।
हुक्म हासिल करी बैठा नानका सब वाओ ।
मत दिख भूला विसरे तेरा चित्त न आवे नाओ ।

गुरु नानक देवजी शिष्यांना सांगतात, प्रिय शिष्यांनो! तुम्ही रिद्धी–सिद्धींमध्ये फसून **नामास विसरू नका**. तुम्ही मोठ्यात मोठ्या प्रदेशाचे राजे किंवा सुलतान जरी बनलात, सर्व जग तुमचे सैनिक बनून, त्या सैन्यावर तुमचे अधिराज्य जरी असले, ते तुमच्या आदेशाचे पालन जरी करीत असले, तुम्ही तुमच्या मर्जीनुसार कोणत्याही राज्यावर दबाव जरी टाकू शकत असलात, तरीही जेव्हा तुम्ही हे जग सोडून जात असाल, त्यावेळी ना हे जग, ना तुमचा राजमुकूट, ना ते सैन्य तुमच्यासोबत जाणार आहे. येथे भलेही लाखो लोक तुम्हांस मानवंदना देत असतील, तुमच्या स्वागतासाठी लाखो वाद्ये वाजत असतील, परंतु या जगातून जाताना आपणांस, जुगारात आपले सर्वस्व गमावून जाणाऱ्या जुगाऱ्याप्रमाणेच जावे लागणार आहे.

अनेक राष्ट्रपती व प्रधानमंत्री आपल्या पाहण्यात येतात, ज्यांच्या हातात एखाद्या राजाप्रमाणे राजसत्ता असते. परंतु त्यांच्या अंतिमवेळी अतिशय करूणरस असलेले शोक–संगीत वाजविले जाते. त्यावेळी कबीर साहेबांची ही वाणी देखील म्हटली जाते:

मन लागो मेरो यार फकीरी में चारो दिशा जंगीरी में ।

आता माझे मन त्या प्रिय परमात्म्याच्या फकीरीत लागले आहे, हातात काठी असून बगलेमध्ये म्हणजेच सोबत काहीच नाही. अंतिमविधीच्या वेळी अंगावरील कपडेदेखील जळतात, शरीराची राख सर्वत्र उडत राहते, त्या राखेपासून कोणाच्यातरी नेत्रांसाठी काजळ बनते. त्याचप्रमाणे आपल्या शरीराची राख देखील कोणाच्या तरी नेत्रांचा सुरमा होईल.

आपण प्रेमाने समजावता की आपल्या सोबत आपले शरीरही जात नाही. तुम्हीच पहा! कोणा राजासोबत वा राष्ट्रपतीसोबत मृत्युसमयी कधी त्याचे सैन्य वा त्याची सत्ता गेली आहे का? तो रहात असलेल्या राजमहालात दुसरे कोणीतरी येऊन स्थित होतो व त्या सैनिकांचा मालक बनतो. तो राजा मात्र रिक्त हातांनीच निघून जातो.

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर श्रद्धांजली देताना सर्वजण त्या मृताचे गुणगान करतात. परंतु परमात्म्यास अशारितीने दिल्या जाणाऱ्या साक्षीची गरज नसते. मृत्यूनंतर जीव परमात्म्याकडे जाण्यापूर्वीच त्या जीवाच्या कर्मांचा सर्व हिशोब तयार असतो. तेथे गेल्यावर ताबडतोब तो कर्मांचा जमाखर्च त्यास सांगितला जातो. धर्मराज सांगतो की तुझ्या कर्मांनुसार तुला शिक्षा म्हणून अमूक एका योनीमध्ये जन्म दिला जात आहे. हा सर्व कर्मांचा हिशोब पाहून जीव पश्चाताप करतो, तो जीव रूदन करू लागतो. परंतु हे रूदन कोण ऐकतो? गुरु नानक देवजी महाराज सांगतात, ''तू मनुष्यजन्मामध्येच शब्द-नामाची कमाई करणे गरजेचे होते. तेथे जर तू परमात्म्याच्या आठवणीत बसून रात्री जागून नामस्मरण केले असतेस, तर ते तुझ्या फायद्याचे होते.''

गुरु नानक देवजी महाराज आपल्या शिष्यांना अतिशय प्रेमाने समजावत आहेत की,''हे बघा बंधूनो! तुम्ही **नामास विसरू नका**. निद्रावस्थेत-जागृतावस्थेत, उठता-बसता तुम्ही नामाची कमाई करा. संत सतगुरु आम्हांस प्रेमाने सांगत आहेत की नामाशिवाय आपण परमात्म्याच्या दरबारामध्ये प्रवेशदेखील करू शकत नाही, मुक्ती मिळणे तर अशक्यच आहे.''

नाम बिना नहीं छूटस नानक साची तरत उतारी ।

***



प्रश्नोत्तरे

परम संत अजायब सिंह महाराजजींनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे,
संतबानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान – २८ फेब्रुवारी, १९८९

एक प्रेमी : महाराज कृपाल अनेकदा सांगत असत की काही बेसत्संगी मुलांचे सतगुरुंप्रती प्रेम सत्संगीप्रेमींपेक्षाही अधिक असते. उदाहरणार्थ पुरुष नर्स या नात्याने मी एका लहान आजारी मुलाची निगराणी करीत होतो. परंतु त्या आजारात त्या मुलाचा मृत्यू झाला. त्या संदर्भात त्या मुलाच्या आईने तुम्हाला पत्र लिहिले असता, तुम्ही त्या पत्राचे अतिशय अप्रतिम उत्तर दिले होते की महाराज कृपालजींनी त्या आत्म्याचा सांभाळ केला (रक्षण केले). माझा प्रश्न हा आहे की बेसत्संगींचे सतगुरुंप्रती असे काय विशेष नाते असते की गुरु त्यांच्यावर सत्संगींएवढेच प्रेम करतात?

बाबाजी : खरे तर मी सत्संगांमध्ये अनेकदा या बाबतीत सांगितले आहे. परंतु आज मी आणखीन सविस्तरपणे याबद्दल तुम्हांस सांगण्याचा प्रयत्न करतो. आशा करतो की तुम्ही प्रेमाने समजून घ्याल.

हे जग अशांती व दुःखांनी ग्रासलेले आहे. आत्मा वेगवेगळ्या खाणींमधील लक्षावधी योनींतून भटकत भटकत मनुष्यजन्म प्राप्त करतो. अशा वेळी त्यास परमात्म्याच्या कृपेची गरज असते. जर परमात्म्याने कृपा केली तर जीव काहीही साध्य करु शकतो. जे आत्मा सत्संगींच्या घरात जन्म घेतात अशा आत्म्यांना भलेही नाम प्राप्त झालेले नसेल, तरीही सतगुरु त्यांचा सांभाळ करतात. अनेकदा शरीर सोडताना हे जीव आश्चर्यजनक शब्द बोलतात की सतगुरु आले असून मी त्यांच्यासोबत जात आहे.

या संदर्भात मी मुक्तसर येथील एक घटना नेहमी सांगत असतो की आठ–नऊ वर्षे वयाची एक लहान मुलगी होती. तिला नामदान प्राप्त झाले नव्हते, तिने केवळ बाबा सावन सिंहजींचे दर्शन घेतले होते. त्या मुलीने तिच्या मृत्यूसमयी कुटुंबियांना सांगितले की,''महाराजजी आले आहेत तेव्हा तुम्ही

अंगणात पाणी शिंपडा. त्यांची गाडी येत आहे. तुम्ही त्या गाडीकडे का पाहत नाही? मला ते दिसत आहेत.''

सर्व कर्ता–करविता प्रभू परमात्मा शब्द रूपाने विश्वातील कणाकणांमध्ये सामावलेला आहे. जेव्हा तो प्रभू परमात्मा कृपेचा वर्षाव करतो, तेव्हा सत्संगींची भेट होते. तुम्हांस कल्पना आहे की जेव्हा सत्संगी नामस्मरण करतात, तेव्हा त्यांची सतगुरुंप्रती असलेली प्रेमभावना अतिशय प्रबळ होते. उठता–बसता, कोणतेही काम करीत असताना मग भलेही तो मुलांना खेळवतही असेल, संसारीक कामकाज करीत असेल, इतर लोकांशी चर्चा करीत असेल, तरीही ते सत्संगी नामस्मरण करीत असतात. मी नेहमी सांगत असतो की जर सत्संगी व्यक्तीच्या लक्षात आले की ध्यान–अभ्यास करीत अंतर्यात तो कोणत्या पातळीपर्यंत पोहोचला आहे किंवा त्याच्या अंतरात किती पारमार्थिक शक्ती आहे, तर असा सत्संगी व्यक्ती ती शक्ती सांभाळून ठेवू शकत नाही. तो विनाकारण ती शक्ती व्यर्थ घालवतो.

गुरु अर्जुन देवजींच्या कारकिर्दीच्या पूर्वी सुरुवातीला केवळ नामस्मरण दिले जात असे. सत्संगीचे नामस्मरण परिपक्व झाल्यानंतर त्यास परमात्म्याचा ध्वनी (धुनात्मक नाम) दिला जात असे. परंतु अनेकदा सत्संगीचे नामस्मरण परिपक्व झालेले नसे, त्यास ध्वनी प्राप्त होण्यापूर्वी एक तर सतगुरु किंवा सत्संगी त्यांचे शरीर सोडून गेलेले असत. नामस्मरण करण्याचा उद्देश केवळ आपले ध्यान नऊ द्वारांतून काढून दोन्ही नेत्रांच्या मध्यभागी एकाग्र करण्याचाच असतो. परंतु आपणांस मुक्ती मात्र ध्वनीयुक्त (धुनात्मक) नामाद्वारेच मिळते.

गुरु अर्जुन देवजींच्या काळी नामस्मरणा सोबतच ध्वनी देऊन शिष्यांची आंतरिक उन्नती करवली जात असे. शिष्यांना आपल्या आंतरिक प्रगतीची कल्पना असल्याने त्यांचे शिष्य मोठ–मोठे चमत्कार करून दाखवू लागले. काबुल येथील एक घटना प्रसिद्ध होती. तेथे काही सत्संगी प्रेमी सत्संगासाठी, गुरुचर्चेसाठी एका प्रेमीच्या घरी गेले असता, त्याच दिवशी त्या घरातील लहान मुलाचा मृत्यू झाला. सर्वांना कल्पना आहे की संसारिक प्रेमामुळे

अशावेळी घरातील लोक विलाप करतात. त्या लोकांचा विलाप पाहून त्या सत्संगींना करूणा आली. त्यांनी सतगुरुंचे नाव घेऊन, नामस्मरण करीत त्या मुलाच्या मृत शरीरास हात लावला असता, तो मुलगा जिवंत झाला.

असे केलेले चमत्कार सतगुरुंना मान्य नसतात कारण असे करणे निसर्गाच्या नियमाविरूद्ध असते. जन्म–मरण परमात्म्याच्या हातात असते. आत्म्यास कधी व कसे न्यावयाचे आहे, याची त्यास कल्पना असते. परंतु अशी शक्ती प्राप्त झाल्यानंतर मनुष्य स्वतःस परमात्म्याचा प्रतिनिधी समजू लागतो किंबहुना तो स्वतःस परमात्म्यापेक्षा थोर समजू लागतो. तो परमात्म्याच्या नियमांविरोधी कृत्ये करू लागतो. यामुळे आपल्या अंतरात घृणास्पद अहंकार निर्माण होतो की हे काम मी केले आहे. प्रभू परमात्म्यास अहंकार पसंद नसतो.

त्या घटनेनंतर सत्संगी व्यक्तींच्या अंतर्यात आडपडदा निर्माण केला गेला, ज्यायोगे त्याने केलेली आंतरिक पारमार्थिक उन्नतीचे त्यास ज्ञान प्राप्त होऊ नये व त्याने केलेली कमाई अशारितीने वाया जाऊ नये.

शिष्य एखादा मिनिट जरी सतगुरुंच्या आठवणीमध्ये बसला असेल, तरी त्याचा मेहनताना ते शिष्यास देतात. शिष्याची पारमार्थिक मेहनतीची जमापुंजी साठवून ते शेवटी त्यासच देतात. जर आपण निर्मळ अंतःकरणाने, नित्यनेमाने ध्यान–अभ्यास, नामस्मरण केल्यास ते त्यामध्ये आणखीन सूट देतात, ते आणखीन मेहनताना त्या शिष्यास देतात. जे शिष्य निर्मळ अंतःकरणाने सतगुरुंचे अभिलाषी बनतात, त्यांना सतगुरु आपली सर्व कमाई देऊन टाकतात.

गुरु हरिरायजींना दोन मुले होती. त्यांची बाबा अटल व गुरुदित्ता अशी नांवे होती. एकदा अटल याने एका मुडद्यास जिवंत केले. गुरु साहेब त्याच्यावर नाराज झाले की त्याने निसर्गाच्या नियमाविरूद्ध असे कृत्य का केले? आपण सर्वजण परमात्म्याचे दास असून त्याची बरोबरी करू शकत नाही. ते अटल यास म्हणाले की, एक तर तू तुझ्या शरीराचा त्याग कर, नाहीतर मी करतो. बाबा अटल यांनी तत्क्षणी आपल्या शरीरावर चादर पांघरून देहत्याग केला. त्यांच्या आठवणीमध्ये नऊ मजल्यांचा महाल बनविला गेला.

याचतऱ्हेने गुरु हरिरायजींचा दुसरा मुलगा गुरुदित्ताने एका मृत गाईस जिवंत केले होते. त्यावेळी गुरुसाहेब त्याच्यावर देखील अतिशय नाराज झाले की त्याने केलेले कृत्य बरोबर नाही. बाबा गुरुदित्ताने देखील त्यावेळी स्वतःच्या देहत्याग केला होता.

याचप्रमाणे रामरायचा सुद्धा विख्यात किस्सा आहे. त्याकाळी गुरुसाहेबांचे गुरुपद त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना न मिळता त्यांच्या परिपूर्ण सेवकास मिळाल्याने, त्याबद्दलची तक्रार कुटुंबातील सदस्य सातत्याने औरंगजेबाकडे करीत असत. त्या कुटुंबातील सदस्यांनी विचार केला की हरिरायजींनी गुरुगादी नीट सांभाळली असून संगतही त्यांना खूप मानते, काही–ना–काही करून त्यांना ठार मारविले तर आपले काम होईल. म्हणून त्यांनी तसे करण्याचा आतोनात प्रयत्नही केला.

गुरु हरिरायजींना औरंगजेबाद्वारे बोलावणे आले की त्यांनी दरबारामध्ये येऊन त्यांच्याबद्दल आलेल्या तक्रारींचे निवारण करावे. त्यावेळी गुरु हरिरायजी स्वतः न जाता त्यांनी रामरायजींना उत्तर देण्यासाठी पाठविले. रामरायजींनी गुरु हरिरायजींना विचारले, ''बादशहाने मला काही चमत्कार करून दाखविण्यास सांगितले तर मी काय करावे?'' गुरु हरिरायजी म्हणाले, ''तू तसा चमत्कार मुळीच करून दाखवू नकोस. तुझ्या अंतरातून जे उत्तर येईल ते उत्तर तू दे, कारण तुझ्या अंतरात बसून सतगुरु स्वतः ते उत्तर देत असल्याने तुला घाबरण्याची काही गरज नाही.''

जेव्हा रामराय औरंगजेबाच्या दरबारामध्ये गेला तेव्हा तेथील काजींनी त्याची खूप स्तुती केली. त्या स्तुतीमुळे रामराय हुरळला.

एक काजी म्हणाला की,''तुम्ही म्हणता की तुमचे हिंदू–मुसलमान सर्वांवरच एकसमान प्रेम आहे. तुमचे जर खरोखर तसे प्रेम असेल, तर आम्ही तुम्हाला मेजवानीसाठी आमंत्रण देत आहोत, त्यामध्ये तुम्ही सामील व्हावे. त्यासाठी आम्ही एक बकरा तुमच्या घरी पाठवू.'' अशरितीने अभिमानाने ताठावलेला रामराय फसला.

काजींनी एका बकऱ्याचा एक पाय कापून, तीन पायांचा मेलेला बकरा रामरायजीकडे पाठविला व म्हटले यास खाऊन टाक. अंतर्यामता असल्याने त्यास जाणवले की काजी त्याच्याकडून दुसऱ्या दिवशी मेलेल्या बकऱ्याची मागणी करणार आहेत. दुसऱ्या दिवशी दरबारात चर्चा होऊ लागली असता काजी म्हणाले, ''आम्ही असे ऐकले आहे की तुम्ही अंतर्यामी तसेच चमत्कार करणारे आहात. तेव्हा काल जो आम्ही तुमच्याकडे तीन पायांचा मेलेला बकरा पाठविला होता, त्यास तुम्ही जिवंत करू शकता काय?''

रामरायने चमत्कार करून त्या तीन पायांच्या बकऱ्यास जिवंत करून उभे केले. चौथा पाय काजींच्या घरी होता. त्याकाळी न्याय करण्याचा अधिकार काजींना होता. काजींनी बकऱ्याच्या चौथ्या पायाबद्दल विचारणा केली असता, तो म्हणाला की,''चौथा पाय या काजीने खाल्ला असून त्याच्याकडे चमत्कार करण्याची शक्ती असल्यास त्याने तो पाय आणून द्यावा.'' त्या बिचाऱ्या काजीकडे ती शक्ती कोठून येणार?

गुरु हरिरायजींना या घटनेबद्दल कळले असता ते रामरायवर नाराज झाले व त्यास म्हणाले, ''तू जे काही कृत्य केले आहेस ते गुरुमताच्या विरूद्ध असल्याने तू माझ्यासमोर येऊ सुद्धा नकोस.'' त्यानंतर रामरायने आपले उर्वरित आयुष्य डेहराडूनमध्येच व्यतीत केले. असाजी की वार* या ग्रंथावर केले गेलेले अनेक सत्संग तुम्ही वाचले आहेत ज्यामध्ये या ओळी येतातः

मिट्टी मुसलमान की पेड़े पई कुम्हार ।
घड़ भांडे ईटां किया जल्दी करे पुकार ।
जल जल रोवे बपरी झड़ झड़ पैन अंगियार ।।

औरंगजेबाने विचारले की, तुमच्या गुरुग्रंथ साहेबमध्ये मुसलमानांची अशी निंदा का केली आहे की मुसलमानांच्या शरीरांची झालेली माती कुंभाराच्या (मातीचे भांडे बनविण्यासाठी वापरत असलेल्या) चाकावर पडताच आक्रोश करू लागते. परंतु बादशहास खूष करण्यासाठी त्या ओळींमध्ये फेरफार करीत

*'परमात्मा के रंग'

रामराय म्हणाला, त्यामध्ये मुसलमानाची माती असे नसून फितूराची माती असे लिहिले आहे. याचे गुरुंना अतिशय वाईट वाटले, म्हणून ते रामरायास म्हणाले,''तुला कोणाची भिती होती? तुला तर तुझ्या पूर्ण सतगुरुंचे संरक्षण होते. तू अंतर्यात सतगुरुंच्या दिशेने थोडी जरी दृष्टी टाकली असतीस तरी त्यांची मदत तुला मिळाली असती.''हे देखील एक कारण होते, ज्यामुळे गुरु हरिरायजींनी रामराय यास तू माझ्यासमोर येऊ नकोस असे म्हणाले होते. अखेरीस रामरायने देहराडून येथे राहून गादी पुढे चालविली. परंतु नंतर त्याच्या सेवकांनी त्यास जिवंतपणीच जाळून टाकले.

गुरु गोविंद सिंहजी महाराज अतिशय विशाल व मृदू हृदयाचे होते. त्यांनी नेहमी रामरायसह गुरुमार्गावर वाटचाल करण्याचा प्रयत्न केला, कारण सर्वांनी मिळून एकत्र वाटचाल करण्यातच सर्वांचे हित असते.

आपले सतगुरु कृपाल प्रेमाचे अथांग सागर होते. ते त्यांच्या विरोधकांस देखील नेहमी हेच सांगत राहिले, ''आपणा सर्वांना परमात्म्याची भक्ती करावयाची असल्याने, या! आपण सर्वजण मिळून परमात्म्याची भक्ती करूया.''

भाई गुरुदासजींच्या संपूर्ण दोन वारांवर सत्संग झाले आहेत. यथोचित समयी रसल पर्किंस त्या सत्संगांचे पुस्तक बनवून संगतची सेवा करतील. त्या पुस्तकाच्या भुमिकेतून तुम्ही ते वाचल्यास तुमच्या लक्षात येईल की गुरु नानक देवजींची गादी प्राप्त झालेले प्रेमीदेखील कसे परमार्थ मार्गावर वाटचाल करण्यात असफल झाले होते. त्यांनी किती नीच कृत्ये केली, तसेच सतगुरुंना किती यातना दिल्या होत्या.

आता मी तुम्हाला 'ज्या लोकांना नामदान प्राप्त झालेले नसूनही सतगुरु त्यांचे रक्षण कसे करतात?' या प्रश्नाचे उत्तर देतो. महाराज सावन सिंहजी सांगत असत, हे एक उघड सत्य आहे की सत्संगी व्यक्तींच्या घरातील पाळीव प्राण्यांचे देखील सतगुरु संरक्षण करतात. सतगुरुंच्या वा त्यांच्या सत्संगीच्या संपर्कात जे लोक येतात, सतगुरु त्यांचे देखील नक्कीच संरक्षण करतात.

संतांनी जर एखाद्या प्राण्यावर स्वार होऊन प्रवास केला, एखाद्या प्राण्याचे दुध प्यायल्यास, एखाद्या वेलीचे किंवा वृक्षाचे त्यांनी फळ खाल्ल्यास, त्या सर्वांना मनुष्य जन्म लाभतो. सतगुरु निःसंशयपणे त्या आत्म्यांचे संरक्षण करतात. परंतु मुक्ती केवळ नामाद्वारेच मिळते. सतगुरु त्यांना मनुष्यजन्माचे हकदार बनवितात. पुढे त्या आत्म्याचे भाग्य असते की सतगुरुंच्या कृपेने मिळालेल्या मनुष्य जन्मात तो परमार्थाकडे वळून त्यास नाम प्राप्त होते वा तो आत्मा त्यास मिळालेली मनुष्यजन्माची सुवर्णसंधी वाया घालवितो.

आतापर्यंत जे प्रेमी मला वैयक्तिक मुलाखतीसाठी भेटले, त्या सर्वांनी त्यांना ध्यान-अभ्यासात आलेले अनुभव मला सांगितले, जे ऐकून मला आनंद झाला. अनेकांनी सतगुरु स्वरूपापर्यंत पोहचून त्यांच्याशी चर्चा देखील केली. परंतु जे काही त्या प्रेमींनी पाहिले, त्याबद्दलचे वर्णन करून सांगण्यास ते असमर्थ आहेत. कारण त्यांनी जे काही पाहिले ते सर्व सत्य आहे यावर त्यांचा विश्वास बसत नाही. त्यांच्या अंतरात मन बळजबरीने असा विचार निर्माण करते की हे स्वप्न तर नाही ना? खरेतर सत्संगामध्ये मी नेहमीच सांगतो की जेव्हा स्वप्नामध्ये सतगुरु येतात, तेव्हा ते स्वप्न नसतेच.

साधारणपणे दिवसभर कामकाज करीत असताना, त्याबद्दलचे तसेच इतर अनेक प्रकारचे विचार आपण करीत असतो. रात्री झोपल्यानंतर आपला आत्मा तिसऱ्या तिळापासून खाली, मन-इंद्रियांच्या पातळीवर येतो, तेव्हा आपणांस वाईट स्वप्नं पडतात. अनेकदा तर आपण खोल खड्ड्यामध्ये पडतो, वाईट गोष्टींचा सामना आपणांस करावा लागतो ज्यामुळे त्या वाईट गोष्टी आपल्या लक्षात राहतात. अशावेळी अनेक दिवस आपण उदास राहतो की असे स्वप्न आपणांस का पडले? एखादी वाईट घटना तर घडणार नाही ना? असे विचार आपल्या मनात येऊ लागतात. परंतु जेव्हा कधी आपणांस स्वप्नामध्ये सतगुरुंचे दर्शन होते, तेव्हा प्रेमींचे मन सतगुरु प्रेमाने अनेक दिवस ओतप्रोत भरलेले राहते. प्रेमींच्या नेत्रांसमोर अनेक दिवस ते मनमोहक स्वरूप दिसत राहते, ज्याचा उपयोग ते त्यांच्या ध्यान-अभ्यासात करून घेतात.

प्रियजनहो! शब्दरूपी सतगुरु शरीराच्या नऊ द्वारांमध्ये कधीच येत नाहीत. मी नेहमी सांगत असतो की आपण झोपतेवेळी आपले लक्ष जर तिसऱ्या तिळाशी एकाग्रीत असेल, तर सतगुरु प्रेमरूपी गळाने जसा लोण्यामधून सुलभतेने केस काढला जातो, त्याप्रमाणे नऊ द्वारांमधून आपल्या आत्म्यास ते वर खेचून घेतात. त्यावेळी आपण जे काही पाहत असतो ते अंतर्यात पाहत असतो, परंतु आपले कपटी मन आपणांस असेच भासवते की आपण जे काही पाहत आहोत ते स्वप्न आहे.

मला महाराज सावन सिंहजींचे अनेक प्रेमी भेटले. उचित समयी त्यांना नामदानही लाभले. त्यावेळी त्यांनी मला त्यांच्या आठवणी सांगितल्या की आम्ही लहान असताना आमचे वाडवडील अशा प्रकारच्या गोष्टी आम्हांस सांगत असत, परंतु आमच्या लक्षात आले नाही की हे इतक्या महान नामाचा व थोर सतगुरुंचा महिमा गात आहेत.

गिदड़वाहा गावच्या बाजारातील ही घटना आहे, त्या संदर्भातील प्रेमीने नंतर येथे येऊन नाम प्राप्त करून घेतले आहे. त्याच्या गावामध्ये महाराज कृपाल सिंहजींचे प्रेमी राहत होते. ते जेव्हा महाराजजींच्या दर्शनासाठी वारंवार दिल्लीस जात असत, तेव्हा सदर प्रेमी विचार करीत असे की यांचे सतगुरु इतके दूर राहतात, तरीही हे सर्वजण त्यांच्या परिवारासह वरचेवर सतगुरुंच्या दर्शनासाठी तेथे का बरे जात असतात? परंतु त्या प्रेमीस याची कल्पना नव्हती की हे सर्वजण किती श्रेष्ठ स्थानी जात आहेत.

तुम्हीच विचार करा, अनेकदा जीवास या जन्मामध्ये सत्संगतीचा फायदा मिळतो. हा प्रेमी त्या प्रेमींसोबत कधी गप्पा-गोष्टी करीत नसे, परंतु त्यास एवढेच माहित होते की ते कोणातरी सतगुरुंकडे जात असतात, त्यांचे त्यांच्या सतगुरुंवर अतिशय प्रेम आहे, ते चांगला ध्यान-अभ्यास करीत आहेत. केवळ या विचारांनीच त्या प्रेमीचा किती फायदा झाला? त्यास याच जन्मामध्ये नामदान प्राप्त करण्याची संधी लाभली.

याच संदर्भामध्ये मी तुम्हास एक गोष्ट सांगत आहे, आशा करतो की त्याचा संदर्भ तुमच्या लक्षात येईल. एक राजा होता, ज्याला केवळ एकच मुलगी होती. त्याने त्या मुलीचा विवाह करण्याचे ठरविले. आमच्या हिंदूस्थानमध्ये रिती–रिवाज आहे की मुलीचे आई–वडीलच तिच्या विवाहसंदर्भात निर्णय घेतात. त्याने राजधानीमध्ये दवंडी पिटविली की, मी एका ठराविक ठिकाणी दडून बसणार आहे, जो तरुण संध्याकाळ होईपर्यंत मला शोधून काढेल, त्याचा विवाह मी माझ्या मुलीशी करून देईन, तसेच त्यास माझ्या राज्याचा वारसदेखील बनवेन. यामध्ये जातीपातीचा, सुशिक्षित वा अशिक्षित असा काहीच भेदभाव नसेल.

अशी दवंडी ऐकून अनेक तरुण मैदानामध्ये उतरले. घरातून निघताना त्यांनी विचार केला की राजास शोधून काढणे काय अवघड आहे? शेवटी तो याच शहरात दडून बसलेला आहे. राजाने शहरातील राजमार्गावर अनेक प्रकारचे स्वादिष्ट खाण्याचे पदार्थ ठेवले, काही ठिकाणी मुजरे आयोजित केले, काही ठिकाणी खेळ–क्रिडेचे आयोजन केले, काही ठिकाणी आकर्षक प्रदर्शने भरविली, काही ठिकाणी नृत्य–गाण्यांची व्यवस्था केली, अनेक ठिकाणी मोफतमध्ये मौजमस्ती करण्यासाठी सुंदर सुंदर वेश्यांची सोय केली.

जे तरुण घरातून राजाचा शोध घेऊन राजकन्येशी विवाह करण्यासाठी तसेच राज्य प्राप्त करण्यासाठी बाहेर पडले होते, त्यापैकी काहीजण जिभेच्या स्वादामध्ये अडकले, काहीजण स्त्रियांशी भोग–विलास करण्यात रमून गेले, तर काहीजण गाणे–संगीत म्हणजेच कानाच्या स्वादामध्ये गर्क झाले. हे सांगण्याचा हेतू म्हणजे अनेकजण आपआपल्या आवडीनुसार मिळालेल्या संधीचा फायदा उठवू लागले.

त्या तरुणांमध्ये एक स्वच्छ व निर्मळ अंतःकरणाचा दृढनिश्चयी तरुण होता. त्याने विचार केला, रस्त्यावरील सर्व गोष्टी आपण नंतरही पाहू शकतो. आपण सर्वप्रथम बादशहाचा शोध घ्यावा, जेणेकरून आपणांस राजकन्या मिळेलच, सोबत राज्यदेखील मिळेल. राजमार्गाने पुढे–पुढे जात असताना

त्याने स्वतःचे लक्ष कोठेही विचालीत होऊ दिले नाही. पुढे तो तरुण गेला असता, तेथे राजा एका बागेत माळ्याच्या वेषात बसला होता. तो तरुण पवित्र अंतःकरणाचा असल्याने, त्याने माळ्याकडे पाहताच ओळखले की हा राजा आहे. राजाच्या नेत्रांमध्ये तसेच मस्तकावर परमार्थाचे तेज विलसत होते. तो तरुण त्याच्या चरणी मस्तक ठेवून म्हणाला,''महाराज आत वेषांतर करून राहण्याची काय गरज? तुम्ही आता तुमचा मुळ वेष धारण करावा.''

ही तर एक गोष्ट आहे. अशाचतऱ्हेने परमात्मा या जगरूपी राजधानीमध्ये अंतर्धाना पावून आपल्या सर्वांच्या अंतरामध्ये बसलेला आहे. ज्याप्रमाणे दुधामध्ये तूप दडलेले असते, तसेच तो दडलेला आहे. तो आपणांस सांगत आहे की जो कोणी त्यास शोधून काढेल, त्यास भेटेल, मी त्याच्या डोक्यावर परमार्थरूपी राजमुकूट ठेवीन. परंतु आपण येथे खाण्या-पिण्यावर, रंग-ढंग करण्यामध्ये, विषय-विकारांमध्ये मशगुल झालो आहोत. तरीदेखील आपणांमध्ये एखादा दृढनिश्चयी असतो, ज्यास रंग-ढंगाची वा विषय-भोगांची आवड

नसते, त्यास केवळ परमात्मारूपी राजास शोधून, भक्तीरूपी कन्येस प्राप्त करुन, राजपाटाचा वारसदार बनण्याचे ध्येय असते. अशारितीने जो मनुष्य अविचलीत हृदयाचा व दृढनिश्चयी असतो, तो या रंग-ढंगी जगात फसत नाहीत, शेवटी तो परमार्थ प्राप्तीमध्ये यशस्वी होतो. सत्संगी व्यक्तीने नेहमी सतगुरुंचा सुंगंध पसरविण्याचे कार्य करावयाचे असते. जे जीव अशा सत्संगीच्या संपर्कात येतात, असे जीव अतिशय भाग्यवान असतात, नामदान प्राप्त करण्याचे उच्च संस्कार त्यांच्यावर होत असतात. ***

पवित्र जीवन

परम संत अजायब सिंह महाराजांनी ध्यान केलेल्या गुहेच्या दर्शनापूर्वी दिलेला संदेश, संतबानी आश्रम, राजस्थान – २ जानेवारी १९८८

परमात्मा सावन कृपालजींनी आपल्यावर दया–दृष्टी करून आम्हांस या दहा दिवसांच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याची संधी दिली आहे. या कार्यक्रमात आपल्या पारमार्थिक तसेच संसारिक **जीवनामध्ये पवित्रतेचे** काय महत्त्व आहे, हे तुम्हा लोकांना समजावण्याचा मी विशेष प्रयत्न केला आहे. जे लोक विषय–विकारांना आपल्या आयुष्यात स्थान देत नाहीत, त्यांचेच मन शांत व स्थिर राहते. आपण जेवढे आपले लक्ष या जगामध्ये पसरवितो, तेवढे आपले मन अशांत होते, ज्यामुळे आपण आपल्या तिसऱ्या तिळापासून तसेच सतगुरु प्रेमापासून दुरावतो. आपणांस महाराज कृपालजींचे माझ्या विषयी सांगितलेले उद्‌गार सदैव लक्षात ठेवले पाहिजेत की याच्या अंतरातून सुगंध येईल, हा चंदनाच्या सुगंधाप्रमाणे दरवळत राहिल, तो सुगंध सात समुद्रांपलिकडेही जाईल. त्यावेळी अनेक लोक जवळ बसलेले होते.

प्रियजनहो! मी देखील सांगत असतो की, सत्संगींच्या अंतरातून सुगंध दरवळावयास हवा. जर सत्संगी व्यक्तीच्या अंतरातून नामाचा सुगंध पसरला तर इतर लोक त्या सुगंधात मस्त होतील, प्रभावित होतील व आपला फायदा करून घेतील. त्या लोकांच्या अंतरात देखील नाम प्राप्त करून घेण्याची इच्छा जागृत होईल. सत्संगी जगत असलेले सुंदर व पवित्र जीवन पाहून तो देखील सत्संगीचे अनुकरण करेल व **पवित्र जीवन** जगण्याचा प्रयत्न करेल. संतमताचे हेच ध्येय असते की आपण या जगात सदगृहस्थ बनावे व परमात्म्याची भक्ती करावी. महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''गुरु–पीरांचा उदो–उदो ते स्वतः करीत नाहीत, तर ते कार्य त्यांचे सेवक करत असतात, ते त्यांच्या सतगुरुंचे नांव उज्वल करतात.'' ते हे सुद्धा सांगत असत की,''संतांची इज्जत त्यांच्या सेवकांच्या हातात असते.'' एक प्रसिद्ध म्हण आहे:

माड़ा कुत्ता खमसे गाली ।

एखादा कुत्रा जर हुशार–चालाख असेल, तर लोक त्याच्या मालकाची प्रशंसा करतात. त्याचप्रमाणे ज्या संतांचे सेवक या जगात जितके जास्त चांगले असतील, शांतमय जीवन जगत असतील, त्या संतांचा महिमा सर्वत्र पसरेल व तितकीच जास्त त्यांची प्रशंसा होईल. तसे झाल्यास संत आपणांस जास्तीत जास्त खूषी व नामाची दौलत बहाल करतील.

सर्वप्रथम सत्संगीने चालता–फिरता किंवा कोणाशी बोलताना स्वतःचे लक्ष आपल्या तिसऱ्या तिळावर (दोन्ही नेत्रांच्या दरम्यान) एकाग्र करून ठेवण्याची सवय स्वतःस लावून घेणे अत्यावश्यक आहे. आपल्या आत्म्यास तिसऱ्या तिळावर एकाग्र होण्याची सवय लागल्यावर त्यास खाली (शरीराच्या नऊ द्वारांमध्ये) खेचत असलेल्या साखळ्या वा बंधन एक–एक करत तुटण्यास सुरुवात होते व आत्मा सुक्ष्म मंडळात पोहोचतो, ज्यामंडळातला कर्ता–करविता ज्योत–निरंजन आहे. त्यापुढे कारण व ब्रम्ह मंडळातील शब्द–ध्वनी येत असतो, ज्यांस सहजपणे पकडून आत्मा कारण व ब्रम्ह मंडळ गाठते.

या स्थूल मंडळामध्ये जेवढ्या प्रमाणामध्ये आपले मन आपणांस सतावित असते, भ्रमात टाकत असते, तेवढ्या प्रमाणात ते आपणांस स्थूल मंडळामध्ये त्रास देत नाही. त्याचप्रमाणे आपले मन आपल्या आत्म्यावर जितके सूक्ष्म मंडळात हावी होते तितके कारण व ब्रम्ह मंडळात हावी होत नाही. त्याचा आपल्यावरील प्रभाव कमीकमी होत जातो. त्याचा मुक्काम खालील मंडळात असल्याने, आपल्या आत्म्याची त्याच्या मगर मिठीतून सुटका होते.

ज्याप्रमाणे समुद्राची एक लाट दुसऱ्या लाटेची वाट पहात नाही, त्याचप्रमाणे मृत्यू देखील कोणाची वाट पहात नाही, म्हणून सत्संगीने वेळेचे महत्त्व जाणून त्याची कदर करावी. मनुष्य जन्मामध्ये येऊन नाम प्राप्त होणे, काळजी वाहणारे व मार्गदर्शन करणारे सतगुरु मिळणे, यासारखी अतिशय चांगली सुवर्णसंधी सत्संगींना लाभली आहे. सतगुरुंनी आपल्या हातात दिलेले शब्दरूपी बोट घट्ट पकडून ठेवणे हे आपले परमकर्तव्य आहे.

आपण ज्यावेळी एखादे वाईट कर्म करतो, त्यावेळी आपणांस कोणीतरी पहात आहे हे दखील आपण लक्षात ठेवावयास हवे, कारण आपले सतगुरु शब्द–रूपाने आपल्या अंतर्यात बसलेले आहेत. सत्संगीला असा ठाम विश्वास हवा की माझ्या सतगुरुंचे माझ्यावर लक्ष आहे, ते पडद्याआड न बोलता बसलेले आहेत. काळ एकही संधी त्याच्या हातून वाया जाऊ देत नाही. तो अंतर्यात सतगुरुंना म्हणतो की,''बघ! तुझा नामधरक शिष्य काय करीत आहे? तू यास नाम दिलेस, परंतु तू त्याची करणी तर पहा!'' परंतु सतगुरु कृपेचा सागर असतात, त्यांच्यात खूप विश्वास व धीर असतो. इतके होऊनही ते काळास सांगतात की,''मला थोडा वेळ दे, मी यास नक्कीच सुधारेन.''

प्रियजनहो, आपल्या अशा करणीमुळे आपल्या प्रिय गुरुंना अंतर्यात त्रास व अवहेलना सोसावी लागते, म्हणून आपण स्वत:स **पवित्र जीवन** जगण्याची सवय लावून घेतली पाहिजे. आपण विचार करा, जर एखादा पाच वर्षांचा मुलगा शेतीची राखण करण्यासाठी बसलेला असेल, तर तेथून एखादे फळ तोडण्याचीही आपली हिम्मत होत नाही. परंतु परमात्मारूपी सतगुरु आपल्या अंतरात वसत असूनही आपण न घाबरता किती वाईट कर्मं करतो. काय आपल्या हृदयात सतगुरुंचे त्या पाच वर्षांच्या मुलाइतकेही भय नाही?

संत–महात्मा या जगात शिष्यांना घाबरट बनविण्यासाठी किंवा आपल्या समाजापासून आपणांस दूर करण्यासाठी येत नसतात. उलट ते आपणांस हेच समजावतात की आपण सद्गृहस्थ बनावे. सद्गृहस्त बनण्यासाठी **पवित्र जीवन** जगण्या व्यतीरीक्त आपण आपल्या कुळाप्रती एकनिष्ठ असणे देखील गरजेचे आहे. आपल्या बद्दल कोणीही असे बोलू नये की हे पहा! या कुळामध्ये जन्म होऊन हा काय करीत आहे? याचे वाडवडील देखील असेच असतील.

आपण आपल्या समाजाप्रती देखील दृढनिष्ठ रहावयास हवे, जेणेकरून प्रत्येकजण म्हणेल की यांच्या समाजात थोर संत जन्मास आले, म्हणूनच यांचे जीवनमान इतके पवित्र आहे, यांच्या हृदयामध्ये सतगुरुंप्रती तळमळ व प्रेम आहे, तेव्हाच यांनी संतांकडून नामदान प्राप्त केले. संत आपणांस हे देखील



सांगतात की आपण आपल्या देशाच्या बाबतीतही कोणतेही दुष्कृत्य करू नये, आपल्या अंतरात देशप्रेम असणे देखील गरजेचे आहे. सर्व संत–महात्मा आपणांस या जगात आपले आयुष्य कसे जगावे याची रित समजावून सांगतात की आपण येथे वास्तव्य करीतच आपल्या पारमार्थिक जीवनाची तयारी करावयाची आहे.

या जागेबद्दल तुम्ही बरेच काही ऐकले व वाचलेही आहे की कशातऱ्हेने कृपादृष्टी करून महाराज कृपालजींनी हे स्थान बनविले आहे. आपल्यासमोर बसलेल्या या गरीब आत्म्यास येथे बसवून त्यांनी कृपेचा वर्षाव केला. त्यांच्या कृपेचे वर्णन जिभेने केले जाऊ शकत नाही. आपण करोडो ग्रंथ जरी लिहिले तरीही त्या कृपावर्षावाचा महिमा वर्णिला जाऊ शकत नाही. एखाद्या झाडाचे फळ खाल्ल्यानंतरच त्या झाडाच्या गुणांचे ज्ञान आपणांस होते, त्याचप्रमाणे ज्यांनी सतगुरुंच्या आदेशांचे पालन केले आहे, त्यासच गुरुमुखतेचा आस्वाद कळू शकतो. ज्यांना नामदान प्राप्त झालेले आहे, त्यांना दयाळू कृपालजी नक्कीच तारतील, कारण त्यांनी त्या आत्म्यांची जबाबदारी घेतलेली आहे व ते आपल्या दरबारात त्यांची वाट पहात असतात. परंतु बहाद्दर तेच प्रेमी असतात, जे त्यांच्या जीवंतपणीच आपल्या सतगुरुंच्या आदेशांचे पालन करतात व आपल्या गुरुंनी सांगितलेले नामस्मरणाचे काम पूर्ण करु शकतात.

***

अमृतवेळ

परम संत अजायब सिंहजी महाराजांद्वारे
प्रेमींना ध्यान-अभ्यासास बसविण्यापूर्वी केलेले मार्गदर्शन

शाह कृपाल प्यारया अटक जरा इक पल जावीं।
असी रोंदे खड़े नसीबां नूं साड्डी सुण दर्दा दीं गल जावीं।।

बंधूंनो! तुम्ही बाह्यजगातून तुमचे लक्ष काढून अंतर्यात जा. सूर्य, चंद्र, तारे व प्रकाश सर्व काही आपल्या अंतर्यातच आहे. आपण जेव्हा आपले बाह्यजगात विखुरलेले लक्ष केंद्रीत करून आपल्या अंतर्यात तिसऱ्या तिळावर एकाग्र करू लागतो, तेव्हा आपला आत्मा व मन हे सर्व काही पाहण्यास सुरुवात करतात. परंतु आपले मन जेव्हा तिसऱ्या तिळावरून खाली येते, तेव्हा ते ना अंतर्यातील प्रकाश पाहू शकते ना अंतर्यातील ध्वनी ऐकू शकते.

संतमत सत्संगीकडून मेहनतीची अपेक्षा करते. शिष्यांना अनेक वर्षे मेहनत करावी लागते. मन आपल्या अंतरामध्ये उतावळेपणा किंवा सुस्ती निर्माण करते. आपणांस ध्यान-अभ्यासामध्ये बसू देत नाही. चुकूनमाकून जर आपण एखाद्याच्या संगतीमुळे दहा दिवस ध्यान-अभ्यास करतो, तेव्हा ते आपल्या अंतरात (आंतरीक अनुभवासाठी) घाई निर्माण करते. आपण जेव्हा श्रद्धा व प्रेमाने नामस्मरण करतो, तेव्हा शरीरामधून मन व आत्मा आकसीत होऊ लागतो. जेव्हा त्यांना आपण तिसऱ्या तिळावर एकाग्र करू लागतो, तेव्हा आपण स्वावलंबी होतो; आपल्या अंतर्यातील परमात्मा प्राप्तीचा मार्ग एखाद्या पुस्तकाप्रमाणे उघडतो. आपल्या अंतरात उत्साह, परमात्म्याप्रती प्रेम व त्यास भेटण्याची तळमळ निर्माण होते.

तुम्ही बाहेरील कोणत्याही आवाजावर लक्ष देऊ नका, कारण प्रत्येकजण आपआपल्या कामामध्ये गर्क आहे. मनास शांत ठेवा, ध्यान-अभ्यासास ओझे वा दडपण न समजता, तो प्रेमाने करा. मनास बाहेर भटकू न देता त्यास आपल्या तिसऱ्या तिळावर एकाग्र करा. बंधूंनो, आता ध्यानास बसा. ***

धन्य अजायब

संतबानी आश्रम १६ पी.एस. राजस्थान येथील सत्संगाचे कार्यक्रम

महाराज कृपाल सिंहजींच्या जन्मदिवसा निमित्त ध्यान–अभ्यासाचा व सत्संगाचा खास कार्यक्रम : २ फेब्रुवारी, २०१४ ते ६ फेब्रुवारी, २०१४

आश्रमातील इतर मासिक कार्यक्रम

२८ फेब्रुवारी, २०१४ ते २ मार्च, २०१४

३१ मार्च २०१४ ते २ एप्रिल २०१४